चिखली येथील श्री भैरवनाथ व हनुमान जन्मोउत्सवा निमित्त सा.प्रगत भारत वृत्तपत्रकाच्या वतीने हार्दिक शुभेच्छा.!

facebook pragatbharat
www.pragatbharat.com
9860 877 789

इराणविरोधातील अमेरिका-इस्रायल युद्धामुळे भारत देशाची परिस्थिती..
(संपादकीय पान क्र २ वर)

साप्ताहिक
# प्रगत भारत

Web:www.pragatbharat.com,youtube-pragatbhart,Em-pragagatbhart@gmail.com,mo.9860877789

LAXMI JEWELLERS
अप्रतिम विश्वासाच अलिशान दालन..
सरकारमान्य सोने-चांदी दागिन्यांची खात्रीशीर जुनी पेढी
लक्ष्मी ज्वेलर्स
रूक्मिणी कॉम्पलेक्स,देहु-आळंदी रोड,टाळगाव चिखली,पुणे मो-९८९०१५४३५४

• वर्ष:१८ • अंक क्र. ३६ • साप्ताहिक • मंगळवार दि.२४ ते ३० मार्च २०२६ • RNI/MAH/MRA/2008/25149 • RNP/पोस्ट- PCE/006/2024-2026 • पृष्ठे-४ • किंमत:२.००

## टाळगाव चिखली येथे श्री भैरवनाथ महाराज उत्सव व हनुमान जन्मोत्सवा निमित्त बैलगाडा शर्यत,कुस्त्यांचा आखाडा व लोकनाट्य(तमाशा)लावण्यांचा कार्यक्रम

टाळगाव चिखली:-देहू-आळंदी या तीर्थक्षेत्राच्या मध्यभागी असलेले व इंद्रायणी नदीच्या काठावरती ऐतिहासिक ओळख असलेले व छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील शहाजी राजे भोसले यांच्या काळातील ऐतिहासिक राजवाडा,शिव मंदिर,पिंपरी चिंचवड शहरामध्ये कबीर महाराज यांचे एकमेव मंदिर, तसेच जगद्गुरू संतश्रेष्ठ संत तुकाराम महाराजांचे वैकुंठगमन करताना त्यांच्या दगाडीटाळचे भव्यमंदिर टाळगाव चिखली येथे उभारले आहे. गावातील जेष्ठ नागरिक व समस्त टाळगाव चिखली मधील ग्रामस्थ व हितचिंतक यांच्या प्रयत्नातून टाळगाव चिखली या गावाला महाराष्ट्र शासनाकडून पर्यटनाचा क दर्जा मिळाला आहे.

पिंपरी चिंचवड शहरामधील टाळगाव चिखली तालुका हवेली जिल्हा पुणे येथील समस्त जनतेस कळविण्यात आनंद वाटतो की,दरवर्षी प्रमाणे याही वर्षी ग्रामस्थांचे व हितचिंतकांच्या सहकार्याने मिती चैत्र शुद्ध पौर्णिमा शके १९४८ गुरूवार ०२/४/२०२६ ते ०५/४/२०२६ पर्यंत श्री भैरवनाथ महाराज,उत्सव व श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा साजरा करण्याचे आयोजित केले आहे. तरी आपण आपले बैलगाडे,ढोल-लेझीम,भजनी भारूड,दांडपट्टा व पैलवान आणून व उपस्थित राहून उत्सवाची शोभा वाढवावी.

**उत्सवातील कार्यक्रमाची रुपरेषा व मान्यवर व्यक्तींची उपस्थिती**

मंगळवार दिनांक २४/०३/२०२६ ते ०२/४/२०२६ पर्यंत अखंड हरिनाम सप्ताह मंगळवार दिनांक ०२/०४/२०२६ रोजी हनुमान जन्मोत्सव सोहळा व पहाटे १ ते ५ श्री हनुमान रुद्रयाग सकाळी ८ ते १० श्री भैरवनाथ महाराज यांच्या पालखीची मिरवणूक, १० ते १२ देवास हार तुरे व पुजा,श्री भैरवनाथ महाराज पूजा व घाटाचे पूजन सायंकाळी ४.३० मि.होणार असून यावेळी भोसरी विधानसभेचे आमदार महेशदादा लांडगे, अण्णा बनसोडे-उपसभापती विधानसभा महाराष्ट्र राज्य, शिरूर लोकसभेचे खासदार डॉ.अमोल कोल्हे,संसदरत्न खासदार श्रीरंग बारणे,वरिष्ठ पोलिस निरीक्षक विठ्ठल साळुंके, महापौर रविभाऊ लांडगे,मा.उपसभापती सुभाष बबनराव मोरे,बाजीराव श्रीपती मोरे पाटील,भैरवनाथ उत्सव समिती अध्यक्ष ॲड.प्रकाश बबनराव मोरे,नगरससेवक कु.यश दत्ताकाका साने,विकास साने,नगरसेविका सोनम विनायक मोरे,संगिता प्रभाकर ताम्हाणे,सारिका नितिन बोऱ्हाडे,विधीसमिती सभापती व नगरसेविका सुजाता निलेश बोराटे राहुल गुलाब जाधव, निखिल शिवाजी बोऱ्हाडे, नगरसेवक कुंदन अंबादास गावकवाड,निलेश मधुकर



नेवाळ,नगरसेविका रिटा सचिन सानप,योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे,तसेच आजी माजी नगरसेवक व नगरसेविका स्विकृत नगरसदस्य,चिखली सोसायटी चेअरमन प्रदिप खंडू आहेर,व्हा. चेअरमन धोंडीबा गोपाळ मोरे,व आजी माजी सरपंच,उपसरपंच, सदस्य,भैरवनाथ उत्सव समिती सर्व पदाधिकारी व सर्व सार्वजनिक क्षेत्रातील पदाधिकारी तसेच सर्व.देवाच्या मानाच्या गाड्यास- देवाच्या माळेल गाडा जोडणाऱ्या गाडा मालकास उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानित केले जाईल.गावच्या बैलगाडा शर्यतींच्या बैलांची मिरवणूक व शर्यत-गुरूवार दिनांक ०२/०४/२०२६ रोजी दुपारी ३ ते ६ वा.स्थळ-श्री भैरवनाथ मंदिर घाट,कुदळवाडी चिखली गावच्या गाड्यास योग्य तो इनाम दिला जाईल.

ज्योतिबाच्या काठीची मिरवणूक-गरूवार दिनांक ०२/०४/२०२६ रोजी रात्री ९ ते १२ वाजेपर्यंत.

परगावच्या बैलगाडा शर्यती- शनिवार दिनांक ०४/४/२०२६ ते रविवार दि.०५/४/२०२६रोजी घेण्यात येतील.स्थळ-श्री नागेश्वर विद्यालय भाग शाळेजवळ,पाटील नगर चिखली.

परगावच्या बैलगाडा शर्यतीस गाडा कमिटीने ठरविल्याप्रमाणे इनाम दिला जाईल.हनुमान मंदिर सजावट-तुकाराम लक्ष्मण तरटे मंदिरातील आतील फुलांची सजावट चक्री भजनाचा कार्यक्रम-रविवार ०३/०४/२०२६ सकाळी ९ ते १२ यावेळेत होईल. स्थळ- टाळमंदीर चिखली.

**कुस्त्यांचा जंगी आखाडा-शुक्रवार ०३/०४/२०२५ दुपारी ३.३० ते रात्री ८.०० पर्यंत असेल. स्थळ- टाळगाव चिखली नागेश्वर हायस्कूल मैदान,पाटीलनगर इंद्रप्रस्थमंगल कार्यालय रोड**

### ● कुस्त्यांचा जंगी आखाडा ●



### ● लोकनाट्य (तमाशा) ●



**लोकनाट्य (तमाशा)-रघूवीर खेडकर सह कांताबाई सातारकर यांचा लोकनाट्य तमाशा मंडळ-गुरूवार दिनांक ०२/४/२०२६ रोजी रात्री ८.०० वाजता रविवार दिनांक-०३/०४/२०२६ रोजी सकाळी ८ ते १० हजेरीचा कार्यक्रम होईल स्थळ-छत्रपती शिवाजी महाराज चौक, गावप्रवेश कमाण टाळगाव चिखली.** adv

## महाराष्ट्र केसरी किताबाचे हर्षवर्धन सदगीर मानकरी



**६८ वा महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर महासंघाचे मान्यतेने आयोजक रामकृष्ण सातव पाटील यांनी स्वर्गीय अजित पवार क्रीडा नगरी,वाघोली (पुणे) येथे आयोजित ६८ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या स्पर्धेच्या अंतिम लढतीत नाशिकच्या हर्षवर्धन सदगीर यांनी दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले आणि ६८ वा महाराष्ट्र केसरी किताब आपल्या नावे केला.त्यांना शिक्षण मंत्री दादाजी भुसे व कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते चांदीची गदा,रोख ५ लाख रुपये आणि फॉर्च्युनर चारचाकी गाडीची चावी प्रदान करण्यात आली.यावेळी वाघोली गावचे ग्रामस्त उपस्थित होते** (सविस्तर बातमी पान क्र २ वर)


## महाराष्ट्राच्या खेळाडूंनी मॅटवरील कुस्तीला प्राधान्य द्यावे-महाराष्ट्र केसरी विजेता हर्षवर्धन सदगीर

**पुणे:**ऑलिम्पिकमध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंना खेळायचे असल्यास मॅटवरील कुस्तीलाच प्राधान्य द्यायला हवे,असे मत महाराष्ट्र केसरी विजेता हर्षवर्धन सदगीर याने व्यक्त केले. यापुढे हिंद केसरी आणि राष्ट्रकुल स्पर्धांमध्ये पदक मिळवणे हे ध्येय असल्याचे त्याने सांगितले.पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने ६८ व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेतील डबल महाराष्ट्र केसरी विजेता हर्षवर्धन सदगीर याचा वार्तालाप आयोजित करण्यात आला होता.

यावेळी प्रशिक्षक अर्जुन पुरस्कार प्राप्त काका पवार, संघाचे सरचिटणीस मंगेश फल्ले, खजिनदार दिलीप तायडे उपस्थित होते. सदगीर म्हणाला, जेथे अजूनही पाणी व पुरेशी वीज नाही अशा गावातून माझ्या कुस्ती करीअरची सुरूवात केली. आजोबांच्या प्रेरणेतून कुस्तीची गोडी लागली. आधी नाशिक व नंतर पुण्यात काका




पवार यांच्या तालमीत प्रशिक्षण घेतले. २०२० ला प्रथमच महाराष्ट्र केसरी स्पर्धा जिंकली;परंतू पुन्हा एकदा मैदानात उतरायचे स्वप्न होते. त्या ध्येयाने मेहनत करत राहिलो आणि पुन्हा एकदा यशस्वी झालो.याचे श्रेय आई-वडील, गुरू यांना देतो, असे त्याने सांगितले. आता लक्ष्य आंतरराष्ट्रीय स्पर्धांवर-पुढील वाटचालीत स्वतःची एक छोटी व्यायामशाळा सुरू करण्याचे स्वप्न आहे. आता संपूर्ण लक्ष्य **(क्रमशा.बातमी पान क्र. २ वर)**



टाळगाव चिखली येथील श्री भैरवनाथ महाराज व हनुमान जयंती उत्सव व यात्रेनिमित्त आलेल्या सर्व पै.पाहुण्यांचे व बैलगाडा मालकांचे काळुबाई अॅक्वा वॉटरच्या वतीने स्वागत..!



टाळगाव चिखली येथील श्री भैरवनाथ महाराज व हनुमान जयंती उत्सव व यात्रे निमित्त सर्व व भक्तांना हार्दिक शुभेच्छा.!

मातोश्री ट्रेडर्स होलसेल

निवडक किराणा मालाचे,सुका मेवा(ड्रायफ्रूट) डाळी,कडधान्य,गहु,ज्वारी,बाजरी व तांदुळ मालाचे होलसेल व्यापारी.



खंडेश्वर निवास,पाटीलनगर,देहू-आळंदीमेनरोड,भाजी मंडई शेजारी,टाळगाव चिखली पुणे-६२
मो-९०९६८५२८०७,८०८७६५१८४०



ॐ कारं बिन्दू संयुक्त नित्यं धायन्ति योगिना:।।कामद मोक्षदं चैव ॐ काराय नमो नम :।।

# संपादकीय

## इराणविरोधातील अमेरिका-इस्त्रायल युद्धामुळे भारत देशाची परिस्थिती..

भारत देश आता प्रगती करत असताना तसेच भारताचे नेतृत्व हे खऱ्याच्या व शांततेच्या मार्गाने असताना आंतरराष्ट्रीय राजकारण किंवा युद्धाचे भारतात पडसाद उमटणे यात अस्वाभाविक असे काही नाही.संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात इराणविरोधातील अमेरिका-इस्त्रायल युद्धामुळे उद्भवलेल्या परिस्थितीवरून गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.युद्ध,इंधन टंचाईबद्दल संसदेत चर्चा होणे अपेक्षित असले,तरी परराष्ट्रमंत्री एस.जयशंकर निवेदन करत असताना विरोधकांनी सभात्याग केला.पश्चिम आशियात शांतता प्रस्थापित करणे, नागरिकांची व भारतीय समुदायाची सुरक्षा सुनिश्चित करणे आणि ऊर्जासुरक्षा व व्यापारासारख्या राष्ट्रीय हितसंबंधांचे संरक्षण करणे,या तिहेरी तत्त्वांवर भारताची भूमिका आधारलेली आहे,असे जयशंकर यांनी स्पष्ट केले.आखाती देशांशी घनिष्ट आर्थिक संबंध व लोकसंपर्क असल्याने युद्धजन्य परिस्थिती भारतासाठी विशेष काळजीची बाब आहे,हे खरेच. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील संरक्षणविषयक केंद्रीय समितीच्या १ मार्च रोजी झालेल्या बैठकीत भारतीयांची सुरक्षा, प्रादेशिक स्थैर्य,व्यापार व आर्थिक देवाणघेवाणीवर होणाऱ्या परिणामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.निवडणुकीचे अपडेट्सआखाती देशांमधील भारतीय प्रवाशांना तसेच विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींचा विचार करून संबंधित मंत्रालयाला तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देशही दिले गेले.आखाती देशांमध्ये एक कोटी भारतीय राहतात.शिक्षण किंवा नोकरीसाठी हजारो भारतीय इराणमध्येदेखील आहेत.हा प्रदेश भारताच्या ऊर्जासुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.येथील अस्थिरता आणि पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे देशावर व्यापक परिणाम होऊ शकतात, अशी कबुली जयशंकर यांनी दिली. स्वातंत्र्योत्तर काळात कोरियन युद्ध थांबवण्यात भारताने महत्त्वाची भूमिका निभावली होती. कम्युनिस्ट गटातील उत्तर कोरिया व अमेरिकेसह पाश्चात्त्य गटांचे समर्थन लाभलेला दक्षिण कोरिया यांच्यात युद्ध सुरू झाले त्यावेळी भारताने सुचवलेला मध्यस्थीचा तोडगा संयुक्त राष्ट्रसंघाने मान्य केला आणि भारतीय शांतिसेनेच्या देखरेखीखाली जून १९५३ मध्ये कोरियात शांतता प्रस्थापित झाली होती.११ सप्टेंबर २००१ रोजी दहशतवाद्यांनी अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या गगनचुंबी मनोऱ्यांना धडक दिली आणि पेंटॅगॉनवर हल्ला चढवला.अमेरिका मध्य पूर्वेतील नैसर्गिक स्रोतांवर ताबा मिळवत आहे.पॅलेस्टाईनविरोधी लढाईत इस्त्रायलला सहाय्य करत आहे.त्याविरोधात संघटन करण्यासाठी मुस्लिम कट्टरतावाद्यांनी धर्माचा आधार घेतला होता.त्याचवेळी काश्मीरपासून भारतातील नवी दिल्ली,मुंबई अशा शहरांतील अतिरेकी घटनांमध्ये वाढ झाली होती.मात्र जोपर्यंत अमेरिकेवर हल्ला झाला नव्हता,तोपर्यंत त्यांना याच्याशी काही देणे-घेणे नव्हते.परंतु तत्कालीन पंतप्रधान वाजपेयी यांनी तेव्हा धोरणीपणा दाखवला.अमेरिका व दोस्त राष्ट्रांनी दहशतवादविरोधी युद्ध छेडण्याची भूमिका घेतल्यावर भारताने राजनैतिक हालचाली करून, काश्मीरमधील दहशतवादालाही त्याच्याशी निगडित करून घेण्यात यश मिळवले. भारताचे सहकार्य आवश्यक असल्याने अमेरिकेने पाकिस्तानला काश्मीरमध्ये कारवाई न करण्याचा दम दिला. त्यानंतर काही काळ या घटना कमी झाल्या.इराण-भारत मैत्रीसंबंध पाहता आणि भारत तेथून मोठ्या प्रमाणावर तेल आयात करत असल्यामुळे. आण्विक धोरणावरून नाटो देशांनी इराणची आर्थिक कोंडी केली.परंतु भारत त्यात सामील झाला नव्हता.त्यामुळे भारत-इराण संबंध बिघडवण्याच्या उद्देशाने इस्त्रायलच्या गुप्तचर संस्थांनी दिल्लीतील बॉम्बहल्ल्याचे कारस्थान रचले असावे, अशा शंका वर्तवण्यात आल्या होत्या.सध्या इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगाला युद्धाच्या खाईत लोटले आहे आणि त्यामुळे होणाऱ्या परिणामांबद्दलची चिंता जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, संयुक्त राष्ट्रसंघ, जागतिक व्यापार संघटना अशा सर्वांनीच व्यक्त केली आहे.हे युद्ध चुटकीसरशी संपेल आणि इराण ताबडतोब शरण येईल, अशा वल्गना ट्रम्प करत होते.परंतु तसे घडलेले नाही.कोणत्याही मुद्द्याचे किंवा समस्येचे निराकरण केवळ लष्करी कारवाईने होऊ शकत नाही. नियम, कायदे, संवाद आणि कूटनीती हाच कोणत्याही संघर्षातून बाहेर पडण्याचा मार्ग असतो, हीच भारताची भूमिका राहिली आहे. युद्धातून मार्ग काढण्यासाठी भारताने युद्धात सहभागी झालेल्या अथवा ज्यांच्यावर हल्ला झाला,त्या देशांच्या प्रमुखांशी चर्चा केली.अमेरिकेबरोबरचा भारताचा व्यापार मोठा असून, चीनला शह देण्यासाठी भारताला अमेरिकेशी संबंध दृढ करणे आवश्यक आहे. इस्त्रायल हा भारताचा प्रमुख संरक्षण भागीदार असून,भारत इस्त्रायलकडून प्रगत क्षेपणास्त्रे,रडार प्रणाली आणि इलेक्ट्रॉनिक युद्धसामग्रीची आयात करतो.इस्त्रायलमधील एल्बिट कंपनीच्या सहकार्याने हैदराबादमध्ये ड्रोन आणि सुटे भाग यांची निर्मिती केली जाते.तर ग्वाल्हेरमध्ये लहान शस्त्रांचे उत्पादन होते. अंतराळ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात भारत-इस्त्रायल भागीदारी वाढत आहे. इस्त्रायल भारताला ब-ह्मोसपेक्षाही वेगवान असे 'गोल्डन होरायझन' क्षेपणास्त्र देणार आहे. याउलट भारत आणि इराण यांचे संबंध प्राचीन असले, तरीदेखील भारत-इराण व्यापार गेल्या सहा-सात वर्षांत १७ अब्ज डॉलर्सवरून १.६८ अब्ज डॉलर्सवर आला आहे. परराष्ट्र धोरण ठरवताना कोणत्याही गटात सामील न होता भारताने प्रथम आपले आर्थिक,व्यापारी व संरक्षणात्मक हित महत्त्वाचे मानण्याचे धोरण स्वीकारले.शेवटी तात्त्विक भूमिकेचे अवडंबर न माजवता व्यवहार जपणे आणि त्याचवेळी जागतिक शांततेसाठी आग्रही भूमिका घेणे, ही भारताची परराष्ट्रनीती राष्ट्रहिताची असली तरी, सध्याच्या तणावपूर्ण युद्धस्थितीत त्यावर ठाम राहताना संबंध बिघडणार नाहीत,याची दक्षता घेण्याचे मोठे आव्हान आहे.

## महाराष्ट्र कुस्तीगीर महासंघ व रामकृष्ण अण्णा सातव पाटील आयोजित ६८ वी वरिष्ठ महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व महाराष्ट्र केसरी किताबाचे हर्षवर्धन सदगीर मानकरी




**पुणे:(जिमाका वृत्तसेवा) राज्यातील विद्यार्थ्यांना लहान वयापासूनच क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात 'क्रीडा स्पेशालिस्ट शाळा'सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याची माहिती शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिली.**

**स्वर्गीय अजित पवार क्रीडा नगरी,वाघोली (पुणे) येथे आयोजित ६८ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चित्रफितीद्वारे स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.त्यांनी स्पर्धेतील मोठ्या सहभागाचे कौतुक करत महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या पारितोषिक रकमेत ४० लाखांवरून १ कोटी रुपयांपर्यंत वाढ करण्यात आल्याचे नमूद केले.राज्यातील कुस्तीपटूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके जिंकण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले.**

**स्पर्धेच्या अंतिम लढतीत नाशिकच्या हर्षवर्धन सदगीर यांनी दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले आणि ६८ वा महाराष्ट्र केसरी किताब आपल्या नावे केला.त्यांना शिक्षण मंत्री दादाजी भुसे व कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते चांदीची गदा,रोख ५ लाख रुपये आणि फॉर्च्युनर चारचाकी गाडीची चावी प्रदान करण्यात आली.**

या स्पर्धेत सोलापूरच्या महेंद्र गायकवाड यांनी उपविजेतेपद पटकावले. त्यांना रोख ४ लाख रुपये तसेच स्कॉर्पिओ गाडीची चावी देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाला आमदार बापूसाहेब पठारे,ज्ञानेश्वर कटके,राष्ट्रीय कुस्तीगीर महासंघाचे अध्यक्ष संजयकुमार,महाराष्ट्र कुस्तीगीर महासंघाचे अध्यक्ष रामदास तडस,संयोजक रामकृष्ण सातव पाटील यांच्यासह कुस्ती संघटनांचे पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले,राज्यातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच क्रीडा क्षेत्रात संधी मिळावी, यासाठी प्रत्येक जिल्ह्यात क्रीडा स्पेशालिस्ट शाळा सुरू करण्यात येणार असल्याची त्यांनी माहिती दिली.

यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी कुस्ती क्षेत्रासाठी माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या योगदानाची आठवण करून दिली. भविष्यात कुस्तीपटूंना भेडसावणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी शासनाकडून सर्वतोपरी मदत करण्यात येईल,अशी ग्वाही त्यांनी दिली.कार्यक्रमात मोठ्यासंख्येने नागरिक उपस्थित होते.

## निसर्गोपचार आश्रमाचे शारीरिक-मानसिक आरोग्याबरोबरच ग्रामीण विकासातही मोलाचे योगदान-उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन

**पुणे:महात्मा गांधीजींनी स्थापन केलेल्या निसर्गोपचार आश्रमाने केवळ व्यक्तींना शारीरिक-मानसिक आरोग्यच प्रदान केले नाही,तर ग्रामीण विकासातही मोलाचे योगदान दिले आहे. ग्रामीण लोकांशी संस्थेने जोडून घेतलेले नाते आणि त्यांना शाश्वतता व स्वावलंबनाचे धडे देण्यासाठी देण्यात येत असलेले प्रशिक्षण अत्यंत प्रशंसनीय आहे,असे प्रतिपादन उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन यांनी केले. उरुळी कांचन (ता.हवेली) येथील निसर्गोपचार आश्रमाच्या ८१ व्या स्थापना दिवस कार्यक्रमात ते बोलत होते.**

यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा,राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह, राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार माऊली उर्फ ज्ञानेश्वर कटके,आश्रमाचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. नारायण हेगडे, वैद्यकीय संचालक आणि विश्वस्त सचिव डॉ. अभिषेक देवीकर, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदीचे मुख्य विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे उपस्थित होते.




उपराष्ट्रपती म्हणाले, उरुळी कांचन या गावात महात्मा गांधीजींनी मणिभाई देसाई, बाळकोबा भावे,श्रीमती गंगाबेन भाटे आणि इतर सहकाऱ्यांच्या मदतीने १९४६ या वर्षी या आश्रमाची स्थापना केली.ही संस्था आता जागतिक स्तरावर सन्मानित होणाऱ्या एका केंद्रात रूपांतरित झाली आहे.या आश्रमाद्वारे मानवतेसाठी दिल्या जाणाऱ्या महान सेवेमुळे आज हे छोटेसे गाव संपूर्ण जगात ओळखले जाते.'निसर्गोपचार आश्रम'ही एक चळवळ आहे, एक तत्त्वज्ञान आहे आणि गांधीजींच्या कालातीत दृष्टिकोनातून प्रेरित झालेली एक जीवनपद्धती आहे.निसर्ग हाच सर्वश्रेष्ठ उपचारक आहे,असा गांधीजींचा दृढ विश्वास होता.नियमित शारीरिक व्यायाम, मानसिक शांतता आणि निसर्गाशी सुसंगत जीवनशैली स्वीकारण्याची प्रेरणा हा आश्रम आपल्याला देतो,असेही ते म्हणाले. खरे आरोग्य हे गुंतागुंतीच्या वैद्यकीय उपचारांमध्ये नसून साधेपणा, शिस्त आणि निसर्गाशी सुसंवाद साधून जगण्यामध्ये सामावलेले असते अशी गांधीजींची शिकवण होती.त्यानुसार हा आश्रम निसर्गोपचार,योगसाधना तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेप्रती असलेल्या आपल्या दृढ कटिबद्धतेच्या माध्यमातून हजारो लोकांची सेवा करत आहे.आज संपूर्ण जग जीवनशैलीशी संबंधित आजारांचा सामना करत आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा आणि तणावाशी संबंधित विकार यांचे प्रमाण आज अत्यंत चिंताजनक वेगाने वाढत आहे. आजकाल प्रत्येकजण तणावाचा सामना करत मर्यादित गरजा आणि निसर्गाशी मेळ साधणाऱ्या जीवनशैलीद्वारे त्यावर मात करता येते,असे श्री. राधाकृष्णन म्हणाले. आरोग्य म्हणजे केवळ रोगाचा अभाव नव्हे, याची हा आश्रम आपल्याला आठवण करून देतो. आरोग्य ही संपूर्ण शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक स्वास्थ्याची अवस्था होय. साधेपणा, कष्ट आणि प्रामाणिक मार्गाने आपण काम केले, तर आनंद आपोआप आपल्या मनात प्रवेश करेल आणि आरोग्य चांगले राहील. आजकाल मोठ्या संख्येने परदेशी पर्यटक उपचारांसाठी आवर्जून येत आहेत. आयुर्वेदिक उपचार,सिद्ध,युनानी उपचारपद्धतींना महत्व आले आहे. आज संपूर्ण जग 'योग दिन' साजरा करत आहे.डॉ. नारायण हेगडे यांचे 'आनंदाची रहस्ये' हे पुस्तक आनंदी जीवनाविषयी भाष्य करणारे आहे, असे त्यांनी सांगितले.राज्यपाल श्री. वर्मा म्हणाले, स्वातंत्र्याच्या वर्षी ३३ कोटी लोकसंख्येवरून आपण १४० कोटी लोकसंख्या गाठली असून आयुर्मयादा दुप्पट झाली आहे.आपण अन्नाच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालो आहे. मात्र, अन्नाची गुणवत्ता, विषयुक्त अन्नामुळे जीवनशैलीशी संबंधित आजारांसह अनेक आजारांचा प्रादुर्भाव वाढला आहे.निसर्गोपचार,आयुर्वेद,योगा, युनानी, आधुनिक उपचारपद्धतीं आपला समृद्ध वारसा आहे. निरोगी तसेच येथील शेतकऱ्यांसाठी गाईंच्या वंशसुधारासाठी प्रयत्न केले.यावेळी श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त डॉ.देखणे यांनीही मनोगत व्यक्त केले.यावेळी डॉ. हेगडे लिखित 'आमच्या आनंदाचे रहस्य' अर्थात 'सिक्रेट्स ऑफ आवर हॅपीनेस' या पुस्तकाचेही प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाला आश्रमाचे विश्वस्त, वैद्यकीय अधिकारी,उपस्थित होते.

प्रगत भारत हे साप्ताहिक वृत्तपत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक संपादक दत्तात्रय तानाजी कांबळे. यांनी त्रिमुर्ती मुद्रिका,५४/२६ एम.आय.डी.सी.चिंचवड पुणे-१९ येथे छापून रजि.मुख्य कार्यालय ऑ.नं.२४,साईकृपा भवन, पहिला मजला, पुणे-मुंबई रोड, खराळवाडी, पिंपरी, पुणे-१८ येथून प्रकाशित केले.संपर्क मो. ९८६०८७७७८९, Web:www.pragatbharat.com सदर अंकात प्रसिध्द झालेल्या वृत्तांशी किंवा लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व कायदेशिर बाबी पिंपरी न्यायालयाअधिन.(पी.आर.बी.कायद्यानुसार जबाबदारी)● RNI No. MAH/MAR/2008/25149 ● Dec. No. PHM/SR/136/VIII/2008 Published on Tuesday and Posted on Thursday
POSTED AT PIMPRI P.F. POST OFFICE LICENCE NO. Reg. No. PCE/006/2024-2026'pragat Bharat' Weekly News paper is owned,printer & Published by Dattatraya Tanaji Kamble,Printed at shree Trimurti Mudrika 54/26,D-2 lockMIDC,Chinchwad,Pune-411018 ● Editor:Dattatraya kamble Email - pragatbharat@gmail.com, Web:www.pragatbharat.com ●RNI No. MAH/MAR/2008/25149 ● legal disputes under pimpri court jurdiction



## पिंपरी-चिंचवडचा पाणीपुरवठा बंद करण्याचा इशारा..

**पिंपरी:**पिंपरी-चिंचवड शहरासाठी पवना धरणातून उचलण्यात येणाऱ्या पाण्याची पाणीपट्टी आणि पाणी शुध्द करत नसल्याचा ठपका ठेवत आकारलेल्या दंडाची असे १४३ कोटींची थकबाकी तात्काळ भरावी,अन्यथा पाणीपुरवठा खंडीत करण्यात येईल,असा इशारा जलसंपदा विभागाने महापालिकेला दिला आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात शहरवासीयांच्या तोंडचे पाणी पळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

पिंपरी-चिंचवड शहराला मावळ तालुक्यातील पवनानगर येथील पवना धरणातून पाणीपुरवठा केला जातो. पवना नदीवरील रावेत बंधारा येथून महापालिका ५५० एमएलडी अशुध्द पाणी उचलते.हे पाणी निगडी,प्राधिकरणातील सेक्टर क्रमांक २३ येथील जलशुध्दीकरण केंद्रात शुध्द केले जाते.त्यानंतर येथून शहरातील विविध भागातील पाणी टाक्यांमध्ये वितरित केले जाते. सध्या उन्हाचा चटका वाढताच अपुरा,कमी दाबाने व अशुध्द पाणीपुरवठ्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे.महापालिकेच्या सारथी हेल्पलाइनवर तक्रारींची संख्या वाढली आहे.पवना धरणातून महापालिकेला ५५० एमएलडी पाणी कोटा मंजूर आहे. त्यानुसार महापालिकेला जलसंपदा विभागाकडून पाणीपट्टीची आकारणी केली जाते. त्यानुसार महापालिकेकडे १४३ कोटींची थकबाकी झाली आहे.ही थकबाकी तात्काळ भरावी,अन्यथा पाणीपुरवठा खंडीत करण्यात येईल,असा इशारा जलसंपदा विभागाने महापालिकेला दिला आहे.

**आठ कोटी सहा लाखांची रक्कम भरली**

महापालिकेकडून पाणीपट्टी नियमित भरली जाते.नुकतीच आठ कोटी सहा लाखांची पाणीपट्टी भरली आहे.सांडपाण्यावर प्रक्रिया न केल्यामुळे जलसंपदा विभागाकडून दंड आकारला जात आहे.थकबाकी भरण्याबाबत जलसंपदा विभागाचे पत्र प्राप्त झाले आहे,असे महापालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी सांगितले.

**महापालिकेकडून अधिक पाण्याचा वापर**

पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून मंजूर कोट्यापेक्षा जास्त पाणी वापरले जाते.मर्यादेपेक्षा जास्त पाणी वापरल्यास ऊन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण होऊ शकते. त्यामुळे महापालिकेने मर्यादेमध्येच पाण्याचा वापर करावा,अशी सूचना जलसंपदा विभागाने दिली आहे.मात्र,महापालिका मंजूर असलेल्या कोट्याप्रमाणेच पाणी उचलते,असा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे.

**२७५ एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया न केल्याने दंड**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शहरातील दहा मैला सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची (एसटीपी) सांडपाणी शुध्द करण्याची क्षमता ३४५ एमएलडी आहे.प्रत्यक्षात महापालिकेकडून केवळ २७५ एमएलडी पाण्यावर प्रकिया केली जाते.त्यामुळे २७५ एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया न करता नदीत सोडले जात असल्याचा दावा जलसंपदा विभागाने केला आहे.प्रक्रिया केलेले सांडपाणी सिंचनास उपलब्ध करून दिले जात नसल्याचा ठपकाही ठेवला आहे. त्यामुळे महापालिकेला जलसंपदा विभागाकडून दंड करण्यात आला आहे.

## गाईमध्ये देशाच्या अर्थकारणाला वेगळी दिशा देण्याची ताकद



**पुणे:**आपण परंपरागत गायीला माता म्हणतो, मात्र गायीपासून इतकी उत्पादने तयार होऊ शकतात हे आपल्याला माहित नाही. गोमूत्र, शेणापासून साकारलेल्या अनेक वस्तूंचा समावेश या अद्भुत अद्वितीय प्रदर्शनात आहे. सर्वसामान्य माणसाला याची कल्पना येऊ शकत नाही, की गायीचे काय काय उपयोग आहेत. देशाच्या अर्थकारणाला वेगळी दिशा देण्याची ताकद गाईमध्ये आहे, असे मत राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले. आंतरराष्ट्रीय संस्था ग्लोबल कॉन्फेडरेशन ऑफ काऊ बेस्ड इंडस्ट्रीज (जीसीसीआय) यांच्या वतीने, महाराष्ट्र गो सेवा आयोग आणि आर. आर. काबेल यांच्या सहकार्याने गौ टेक २०२६ या आंतरराष्ट्रीय शिखर परिषद व प्रदर्शनाचे आयोजन कृषी महाविद्यालय मैदान, शिवाजीनगर, पुणे येथे करण्यात आले आहे. या प्रदर्शनाला कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांसह अनेक मान्यवरांनी भेट दिली.

जीसीसीआयचे संस्थापक, माजी केंद्रीय मंत्री तसेच राष्ट्रीय कामधेनू आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. वल्लभभाई कथिरिया, महाराष्ट्र गौ सेवा आयोगाचे अध्यक्ष व गौ टेक २०२६ चे आयोजनाध्यक्ष शेखर मुंदडा यावेळी उपस्थित होते. डॉ. वल्लभभाई कथिरिया म्हणाले, गौ टेक हे केवळ एक प्रदर्शन नसून गौ-आधारित अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्थेला केंद्रस्थानी ठेवून भारताला आत्मनिर्भर व संस्कारित बनविण्याच्या दिशेने एक व्यापक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अभियान आहे.

## प्रभाग क्र.२० संत तुकाराम नगरचे 'टपरीनगर' नामकरण करा; नगरसेवक जितेंद्र ननावरे यांचे आयुक्तांकडे मागणी

**पिंपरी:-प्रभाग क्रमांक २० संत तुकारामनगर परिसरात टपरीधारक व टपरी माफियांचा मोठ्या प्रमाणावर सुळसुळाट झाल्याचा गंभीर आरोप करत राष्ट्रवादीचे नगरसेवक जितेंद्र ननावरे यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तांकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे.**

परिस्थिती नियंत्रणात न आल्यास या परिसराचे नाव 'टपरीनगर' करण्याची वेळ येईल,असा इशाराही त्यांनी दिला आहे.जितेंद्र ननावरे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,संत तुकारामनगर,मेट्रो स्टेशन परिसर,वल्लभनगर एसटी स्थानक, वाय.सी.एम. रुग्णालय,डॉ. डी.वाय.पाटील रुग्णालय तसेच मंडई परिसरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत टपऱ्या उभ्या राहिल्या आहेत.टपरी माफियांनी पदपथांवर अतिक्रमण करून त्या जागा पथारीवाले व फेरीवाल्यांना भाड्याने देत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.या टपऱ्यांमुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून, नागरिकांना चालण्यासाठीही जागा उरलेली नाही.विशेष म्हणजे, रुग्णालयांच्या परिसरात अतिक्रमण झाल्याने रुग्णवाहिका वेळेवर पोहोचण्यात अडथळे निर्माण होत असल्याची बाबही समोर आली आहे.



**पिंपरी:-प्रभाग क्रमांक २० संत तुकारामनगर परिसरात टपरीधारक व टपरी माफियांचा सुळसुळाट झाल्याचा गंभीर आरोप करत राष्ट्रवादीचे नगरसेवक जितेंद्र ननावरे यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉं.विजय सुर्यवंशी यांच्याकडे याबाबतचे लेखी निवेदन दिले आहे.**

तसेच, टपरीधारकांकडून कचरा व सांडपाणी रस्त्यावर टाकले जात असल्याने परिसरात अस्वच्छता वाढली आहे.नागरिकांनी तक्रार केल्यास त्यांना दमदाटी व दबावाला सामोरे जावे लागत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. प्रशासन कारवाईसाठी गेले असता काही टपरीधारकांकडून राजकीय दबाव आणला जात असल्याचेही ननावरे यांनी नमूद केले आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.या सर्व पार्श्वभूमीवर,अनधिकृत टपऱ्यांवर तातडीने कारवाई करून अतिक्रमण हटवावे, वाहतूक सुरळीत करावी आणि नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी जितेंद्र ननावरे यांनी केली आहे. अन्यथा, संत तुकारामनगरचे 'टपरीनगर' असे नामकरण करण्याची कार्यवाही करावी, अशी उपरोधिक मागणी त्यांनी आयुक्तांकडे केली आहे

## राज्यात व देशात रमजान ईद उत्साहात

**पुणे:**मुस्लीम धर्मियांसाठी पवित्र असणारी रमजान ईद शहरात शनिवारी उत्साहात आणि आनंदात साजरी करण्यात आली. सकाळी नऊ वाजता शहरातील ईदगाह मैदानावर एकत्रित नमाज पठण केल्यानंतर सर्व मुस्लीम धर्मियांनी एकमेकांना 'ईद मुबारक' करत आलिंगन देऊन शुभेच्छा दिल्या. यानंतर शहरभर सर्वत्र ईदचा उत्साह पाहायला मिळाला.

गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या पवित्र रमजान महिन्यानिमित्त मुस्लीम धर्मियांच्या रोजाची सांगता झाली. महिन्याभरापासून रमजान महिन्याच्या पवित्र सणाला सुरुवात झाली. या काळात शहरातील मशिदींमध्ये विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तर पहाटेची सहेरी झाल्यानंतर दिवसभर नमाज, कुराण पठण करण्यात आल्यानंतर सायंकाळी इफ्तारीचे आयोजन केले जात होते. आज अबालवृद्धांनी नवीन कपडे परिधान करून नमाज पठाण केले. सर्वधर्मीयांकडून मुस्लीम धर्मियांना शुभेच्छा देण्यात आल्या.

अनेकजणांनी एकमेकांच्या घरी जाऊन शिरकुर्म्याचा आस्वाद घेत ईद साजरी केली. विविध राजकीय पक्षांनी देखील ईदच्या शुभेच्छा दिल्या.लहान मुलांनीही सणाचा मनसोक्त आनंद लुटला.रमजान ईद हा मुस्लीम धर्मियांसाठी पवित्र सण मानला जातो.महिन्याभराचे उपवास (रोजे),अल्लाहचे नामस्मरण,प्रेम,त्याग,समर्पण अशा वैशिष्ट्यांसाठी रमजान ईद ओळखली जाते. सामाजिक बंधुभाव, एकात्मता,भाईचारा वाढीस लागण्यात ईद महत्त्वाची ठरते. रमजानच्या निमित्ताने महिनाभर शहरातील वातावरण उत्साहाने भरून गेले होते.प्रत्यक्ष भेटींच्या सोबतच दिवसभर विविध समाजमाध्यमांवर अनेकांनी एकमेकांना ईदच्या 'व्हर्च्युअल' शुभेच्छा दिल्या.

## बाटली बंद पाणी विक्रीच्या नावाखाली अडीच कोटींची फसवणूक तिघांविरूध्द गुन्हा

**पुणे:**बाटली बंद पाणी विक्रीच्या व्यवसायात गुंतवणूक केल्यास चांगला नफा मिळेल, असे आमिष दाखवून दोघांनी एका पेट्रोल पंप व्यावसायिकाची तब्बल दोन कोटी ३४ लाखांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी लोणी काळभोर पोलिसांकडून तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हा प्रकार लोणी काळभोरमधील कदमवाक वस्ती परिसरात १ डिसेंबर २०२४ ते १९ मार्च २०२६ दरम्यान घडला आहे. प्रतीक राजेश काबरा, रोहित राजेश काबरा आणि राजेश सत्यनारायण काबरा (तिघेही रा. त्रिवेणीनगर, हडपसर) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपी तिघांची नावे आहेत. याबाबत आनंद लाहोटी (रा. हांडेवाडी रोड, हडपसर) या व्यावसायिकांनी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. तक्रादार व्यावसायिक हे हडपसर परिसरातील हांडेवाडी भागातील असून आरोपी हे हडपसर भागात राहायला आहेत. आरोपींचे वस्त्रदालन आहे. आरोपी आणि पेट्रोल पंप व्यावसायिक हे ओळखीचे आहेत. आरोपींनी त्यांना बाटली बंद शुद्ध पाणी विक्री व्यवसायात गुंतवणुकीचे आमिष दाखवून गुंतवणूक केल्यास चांगला नफा मिळेल, अशी बतावणी केली. त्यानुसार १७ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांच्यात भागीदारी करार झाला. या कराराद्वारे गुंतवणुकीपोटी त्यांच्याकडून एक कोटी ७८ लाख ७५ हजार रुपये इतकी रक्कम घेण्यात आली. जून ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत या व्यवसायातून मिळालेले ५५ लाख ४८ हजार रुपये आरोपींनी स्वत:च्या बँक खात्यात जमा करुन घेतले. यातील कुठलीही रक्कम फिर्यादींना मिळाली नाही. त्यामुळे आपली मोठी आर्थिक फसवणूक झाल्याचे समजताच व्यावसायिकाने पोलिसांकडे धाव घेतली.

## महाराष्ट्राच्या खेळाडूंनी मॅटवरील कुस्तीला प्राधान्य द्यावे-महाराष्ट्र केसरी विजेता हर्षवर्धन सदगीर

**(क्रमशा बातमी पान क्र १ वरून)**

आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या तयारीवर केंद्रित करणार आहे. नवीन मल्लांनी मेहनतीमध्ये सातत्य ठेवावे. मेहनत केल्यास कोणत्याही खेळात यश हमखास मिळते. यावेळी त्याने लहानपणापासूनचा आतापर्यंतचा कुस्ती खेळातील प्रवास, आलेल्या अडचणी व भविष्यातील ध्येय यावर प्रकाश टाकला.

सरकारने संधी दिल्यास नोकरी स्वीकारेन-पहिल्यांदा केसरी स्पर्धेत विजेता झाल्यावर सरकारदरबारी खेट्या मारूनही नाशिक महानगरपालिकेत क्रीडा अधिकारी म्हणून नियुक्तीची अपेक्षा पूर्ण झाली नाही. आता झालेल्या स्पर्धेवेळी भावनेच्या भरात मी कुस्ती सोडणार व नोकरी करणार नाही असे म्हणालो होतो. पण आता सरकारने संधी दिल्यास मी नक्कीच नोकरी स्वीकारेन, असे हर्षवर्धन याने यावेळी सांगितले.

राजकारणामुळे खेळाडूंचे नुकसान : काका पवार-कुस्तीत राजकारण घुसल्यामुळे तसेच संघटनांमधील वादामुळे खेळाडूंचे नुकसान होत आहे. मात्र, खेळाडूंनी हे वाद बाजूला ठेवून ऑलिम्पिकचे स्वप्न पाहावे. दरम्यान महाराष्ट्रानेही या खेळाला प्रोत्साहन द्यायला हवे. हरियाना राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र मागे पडत असून, मातीसोबतच आता मॅटवर पकड मजबूत करणे काळाची गरज आहे. राज्यात सध्या तीन उपअधीक्षक कुस्तीपटू आहेत, सरकारने त्यांना सोबत घेऊन नवीन खेळाडू घडवण्यासाठी ठोस धोरणं बनवली पाहिजेत', अशी अपेक्षा सदगीरचे प्रशिक्षक काका पवार यांनी यावेळी केली.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम(उत्तर) विभाग,पुणे-४११००१**
**दुरध्वनी क्रमांक-०२०-२६१२३३०५**
Web-www.mahapwd.gov.in & e-mail-northpune.ee@mahapwd.gov.in
**निविदा सूचना क्रमांक १५ सन २०२५-२०२६(ऑफलाईन)**

कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम(उत्तर)विभाग,पुणे-४११००१(दुरध्वनी क्रमांक-०२०-२६१२३३०५)हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून या विभागाच्या कार्यकक्षेतील रूपये १०.०० लक्ष पेक्षा कमी किंमतीचे कामांकरिता ब-१ नमुन्यातील कोरे निविदा संच सार्वजनिक बांधकाम खात्याच्या **www.mahapwd.gov.in-Important Application** वरील **Pay PWD Online** या संकेतस्थळावर दिनांक-२४/०३/२०२६ ते ०१/०४/२०२६ पर्यत निविदा शुल्क भरण्यात येऊन डाऊनलोड केलेल्या निविदाची प्रिंटी घेऊन हार्ड कॉपीचे स्वरूपात भरावयाच्या आहेत.सदर भरलेल्या निविदा सिलबंद करून कार्यकारी अभियंता,सा.बां.(उत्तर)विभाग,पुणेयांचे कार्यालयात दिनांक ०४.०४.२०२६ रोजी दुपारी १४.०० वाजेपर्यत स्विकारतील आणि शक्य झाल्यास त्यांच दिवशी दुपारी १४.३० नंतर उघडतील.

तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी,सा.बां.(उत्तर)विभाग,पुणे यांनी राखून ठेवलेला आहे. कंत्राटदाराची अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम (उत्तर)**
**विभाग,पुणे-४११००१**

**जिमाका/पुणे/जाहिरात/९१७/२०२२६**

# इच्छाशक्ती आणि आत्मविश्वासाद्वारे महिला कर्तुत्व सिद्ध करू शकतात – उद्योजिका उज्वला हावरे

## पीसीयू वूमन लीडरशिप कॉन्क्लेव्ह' मध्ये उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ महिलांची उपस्थिती






**पुणे:**प्रबळ इच्छाशक्ती आणि आत्मविश्वासाद्वारे महिला देखील उद्योग व्यवसायात कर्तृत्व सिद्ध करू शकतात असे प्रतिपादन हावरे इंजिनिअर्स अँड बिल्डर्स प्रा. लि. च्या व्यवस्थापकीय संचालिका उज्ज्वला हावरे यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) येथे इंडस्ट्री इन्स्टिट्यूट इंटरॅक्शन सेलच्या (आयआयआयसी)वतीने आयोजित केलेल्या "पीसीयू वूमन लीडरशिप कॉन्क्लेव्ह २०२६" मध्ये हावरे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी पीसीइटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करण्यामध्ये विद्यापीठांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. उद्योग क्षेत्रातील यशस्वी व्यक्तींशी संवाद साधण्याची संधी मिळाल्यास विद्यार्थ्यांना व्यावहारिक दृष्टिकोन प्राप्त होतो आणि ते आपल्या करिअर मध्ये यशस्वी होऊ शकतात. पीसीयू हे एक बहुविषयक विद्यापीठ असून शैक्षणिक उत्कृष्टता, उद्योगाभिमुख शिक्षण, संशोधन आणि नवोपक्रम यासाठी वचनबद्ध आहे. नेतृत्व कॉन्क्लेव्ह, उद्योग संवाद आणि जागतिक सहकार्य यांसारख्या उपक्रमांद्वारे विद्यापीठ विद्यार्थ्यांना भविष्यातील व्यावसायिक आव्हानांसाठी सक्षम बनवत आहे.

यावेळी कुलगुरू डॉ. संतोष सोनावणे, पीसीयू व्यवस्थापन समिती सदस्य सचिन इटकर, प्र-उपकुलगुरू डॉ.सुदीप थेपडे,रजिस्ट्रार डॉ. अनिल महेश्वरी आणि डॉ. पुरबी गराई (शास्त्रज्ञ,डीआरडीओ), डॉ. मीताली मोरे (एमएसएमई मेंटर), डॉ. तृप्ती रामाने (संचालक, महाराष्ट्र स्टेट बिझनेस असोसिएशन), ॲड. प्रीती परदेशी (उपाध्यक्ष,पुणे बारअसोसिएशन),तन्वीऔरडकर (संस्थापक,कार्पेडियम),अनुराधा ठाकूर (एचआर बिझनेस पार्टनर, वेसुवियस ग्रुप), रती चौंडावर (हेड एचआर, पोसिव्ह्यू टेक्नॉलॉजीज), डॉ. जहानआरा पठाण शेरडी (सिनियर मॅनेजर, रिक्रूटमेंट अँड आउटप्लेसमेंट, क्वेस कॉर्प),ज्योती यादव (टॅलेंट ॲडक्विझिशन मॅनेजर,कॅव्हिस्टा) आणि वैशाली दराडे (सिनियर एचआर,मॅग्ना इंटरनॅशनल) आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी सांगितले की, प्रगत आणि सर्वसमावेशक समाज निर्माण करण्यासाठी महिला नेतृत्वाला प्रोत्साहन देणे अत्यंत आवश्यक आहे. या कॉन्क्लेव्हमध्ये उद्योग क्षेत्रातील महिला प्रतिनिधी, तज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ यांनी विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी सचिन इटकर यांनी आर्थिक आणि उद्योग क्षेत्रात महिलांची वाढती भूमिका महत्वपूर्ण आहे असे मत व्यक्त केले.

ही परिषद पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील, व्यवस्थापन समिती सदस्य अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली होती. डॉ. प्रणव चरखा (संचालक, इंडस्ट्री इन्स्टिट्यूट इंटरॅक्शन सेल) आणि डॉ. अर्चना राठोड (संचालक, विद्यार्थी विकास विभाग) यांनी संयोजन केले, तर अक्षता राजगुरू यांनी सूत्रसंचालन केले

**साप्ताहिक प्रगत भारत**
वृत्तपत्रकाचे आजच सभासद व्हा व घरपोच अंक मिळवा वार्षिक ५००/-रू दुवार्षिक १००/- रूपये अधिक माहिती व जाहिरातीसाठी संपर्क- ९८६०८७७७८९

# दक्षिण भारतानंतर महाराष्ट्रात पहिल्यांदाच सिनेमा लॉन्चपुण्यातील हिंजवडी येथे ई-स्क्वेअर मल्टीप्लेक्सचे भव्य उदघाटन




**पुणे:**क्यूब सिनेमा ने आज पुण्यातील ई-स्क्वेअर सिनेमाजमध्ये आपल्या प्रीमियम लार्ज फॉरमॅट सिनेमा **EPIQ** च्या लॉन्चची घोषणा केली. हे पाऊल त्यांच्या लार्ज-फॉरमॅट सिनेमा अनुभवाच्या विस्तारासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. २०१९ पासून दक्षिण भारतात प्रेक्षक आणि तंत्रज्ञांकडून मोठी प्रशंसा मिळवल्यानंतर, **EPIQ** आता पहिल्यांदाच महाराष्ट्रात प्रवेश करत आहे, ज्यामुळे आपल्या विशेष तंत्रज्ञान, भव्यता आणि इमर्सिव अनुभवासह भारतातील सर्वात गतिमान सिनेमा बाजारांपैकी एका बाजारात पदार्पण करत आहे.सुल्लूरपेट, कोयंबटूर, कोझिकोड, मदुरै, तंजावूर, हैदराबाद, त्रिशूर, राजापालयम आणि चेन्नई यांसारख्या दक्षिण भारतातील प्रमुख शहरांमध्ये यशस्वी स्थापना केल्यानंतर, पुण्यातील लॉन्च हा **EPIQ** च्या राष्ट्रीय विस्तारातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. हे भारतीय प्रेक्षकांमध्ये प्रगत तंत्रज्ञान आणि इमर्सिव थिएटर अनुभवासाठी वाढती मागणी देखील दर्शवते.

ई-स्क्वेअर सिनेमाजमधील **EPIQ**ऑडिटोरियम मोठ्या प्रमाणात,उत्कृष्ट दृश्य स्पष्टता आणि प्रेक्षकांच्या सोयी लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आले आहे. यात भिंतीपासून भिंतीपर्यंत मोठी स्क्रीन,स्टेडियम-शैलीतील आसन व्यवस्था आणि प्रत्येक सीटवरून उत्कृष्ट अनुभव देणारे वातावरण आहे. पुण्यातील **EPIQ** मध्ये **Barco 4k RGB** लेझर प्रोजेक्शन,**Dolby Atoms** इमर्सिव साउंड आणि १.८९:१ स्क्रीन रेशो यांसारख्या प्रीमियम तंत्रज्ञानांचा समावेश आहे,जे फ्लॅट आणि स्कोप दोन्ही फॉरमॅटसाठी योग्य आहे. यामुळे उच्च ब्राइटनेस, उत्तम कॉन्ट्रास्ट, अचूक रंग आणि उत्कृष्ट ध्वनी अनुभव मिळतो. चित्रपटांना क्यूबद्वारे विशेषतः साठी ऑप्टिमाइझ केलेल्या डिजिटल सिनेमा पॅकेजेस (**DCPS**) मध्ये तयार केले जाते, ज्यामुळे मोठ्या फॉरमॅटमध्ये उत्तम गुणवत्ता मिळते. क्यूब सिनेमा चे मुख्य कार्यकारी अधिकारी हर्ष रोहतगी म्हणाले:"**EPIQ** ची सुरुवात दक्षिण भारतात झाली आणि वर्षानुवर्षे ते प्रीमियम सिनेमाचे मानक बनले आहे. पुणे आणि पश्चिम भारतात ते आणणे हा आमच्यासाठी महत्त्वाचा टप्पा आहे, ज्यामुळे ते प्रादेशिक नसून राष्ट्रीय ब्रँड बनत आहे.

ई-स्क्वेअर हा आमच्यासाठी आदर्श भागीदार आहे."ई-स्क्वेअर लीजर प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक हेमंत पंचामिया म्हणाले:"ई-स्क्वेअर सिनेमाजमध्ये आमचा उद्देश नेहमीच प्रेक्षकांना सर्वोत्तम अनुभव देणे हा आहे. आमच्या मूल्यांचे भव्यता, तंत्रज्ञान आणि सिनेमाचा जादू प्रतीक आहे. महाराष्ट्रातील पहिल्या मल्टीप्लेक्सपैकी एक म्हणून आम्हाला हा नवीन अनुभव पुण्यात आणताना आनंद होत आहे." बद्दल हा क्यूब सिनेमा द्वारा विकसित केलेला प्रीमियम लार्ज फॉरमॅट सिनेमा संकल्पना आहे. यात उच्च-कॉन्ट्रास्ट लेझर प्रोजेक्शन, १.८९ स्क्रीन रेशो आणि इमर्सिव साउंड तंत्रज्ञान वापरले जाते. कंटेंट ४ रिझोल्यूशनमध्ये तयार केला जातो आणि उच्च गुणवत्तेसाठी विशेष ग्रेडिंग केली जाते.या सिनेमातील प्रत्येक घटक आसन व्यवस्था, दृश्य कोन, ध्वनी आणि प्रकाश असा डिझाइन केला आहे की प्रत्येक सीटवरून सर्वोत्तम अनुभव मिळेल. पहिला स्क्रीन २०१९ मध्ये आंध्र प्रदेशातील सुल्लूरपेट येथे लॉन्च झाला होता.क्यूब सिनेमा बद्दलक्यूब सिनेमा ही डिजिटल सिनेमा तंत्रज्ञान आणि सोल्यूशन्स पुरवणारी अग्रगण्य कंपनी आहे. ही कंपनी फिल्म निर्मितीपासून प्रदर्शनापर्यंत संपूर्ण सिनेमा इकोसिस्टमला डिजिटल पद्धतीने जोडते. तिची उत्पादने १४० पेक्षा अधिक देशांमध्ये वापरली जातात आणि ती दरवर्षी १८०० पेक्षा अधिक चित्रपट प्रक्रिया करते. ई-स्क्वेअर मल्टीप्लेक्स बद्दल२३ वर्षांच्या अनुभवासह, ई-स्क्वेअर ही भारतातील प्रमुख मनोरंजन कंपन्यांपैकी एक आहे. ही कंपनी चित्रपट प्रदर्शन आणि वितरण क्षेत्रात मजबूत उपस्थिती ठेवते तसेच पुण्यात हॉटेल आणि रेस्टॉरंट व्यवसायही चालवते.

# कृष्णानगर येथे ५१ फूट उंच भगव्या ध्वजाचे राष्ट्रार्पण

**पिंपरी**-पिंपरी-चिंचवड महानगरपलिका प्रभाग क्रमांक ११ मधील कृष्णानगरमध्ये हिंदु नववर्षारंभ अर्थात गुढी पाडवाच्या निमित्ताने भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते ५१ फुटी भव्य भगव्या ध्वजाचे राष्ट्रार्पण करण्यात आले.

ध्वजारोहण सोहळा कामगार नेते सचिन लांडगे यांच्या शुभहस्ते पार पडला.आकाशात झेपावलेला भगवा ध्वज पाहून उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट करत अभिमान व्यक्त केला. या भव्य उपक्रमाची संकल्पना जगदंब प्रतिष्ठान, कृष्णानगर यांनी केली असून,स्थानिक




नगरसेविका रिटा सचिन सानप आणि सामाजिक कार्यकर्ते सचिनसानप यांच्या पुढाकारातून हा सोहळा साकार झाला.सोहळ्यात आमदार महेश लांडगे, कामगार नेते सचिन लांडगे,नगरसेवक निलेश नेवाळे, कुंदन गायकवाड, योगिता नागरगोजे, पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे आणि अनेक समाजसेवी तसेच नागरिक उपस्थित होते.

# बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नोलॉजी प्रा.लि. कामगिरीची दखल..इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स कडून त्यांना सन्मानित



**पिंपरी:पुणे महानगर परिसरात बांधकाम क्षेत्रात एक अभूतपूर्व कामगिरी समोर आली असून,केवळ १०० दिवसांत १४ मजली उंच निवासी इमारत उभी करत बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नोलॉजी प्रा.लि.यांनी इतिहास घडवला आहे.या विक्रमी कामगिरीची दखल घेत इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स कडून त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वतीने सेक्टर-१२,चिखली येथे तब्बल ६,४५२ घरांच्या प्रकल्पातील एका इमारतीचे काम अवघ्या १०० दिवसांत पूर्ण करण्यात आले.सुमारे ८०,४५३ स्क्वेअर फूट क्षेत्रफळ असलेल्या या इमारतीत अत्याधुनिक ३ एसप्री-फॅब तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. हे तंत्रज्ञान भारत सरकारच्या केंद्रीय लोकनिर्माण विभागाकडून (**BMTPC**)मान्यता प्राप्त असल्याने या प्रकल्पाची गुणवत्ता आणि सुरक्षितता अधिक ठळकपणे अधोरेखित होते.

या १४ मजली इमारतीतील प्रत्येक घर सुमारे ५२७.४३ स्क्वेअर

फूट क्षेत्रफळाचे असून,दोन बेडरूमसह सर्व सोयी-सुविधांनी सुसज्ज आहे. रहिवाशांसाठी दोन लिफ्ट्स, अग्निशामक यंत्रणा, सौरऊर्जा प्रणाली, पाणीपुरवठा अशा अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.विशेष म्हणजे, एवढ्या वेगाने आणि गुणवत्तेची तडजोड न करता पूर्ण झालेल्या या प्रकल्पामुळे बांधकाम क्षेत्रात एक नवा मापदंड निर्माण झाला आहे. इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सचे प्रतिनिधी अशोक अदक यांनी प्रत्यक्ष पाहणी करून या कामगिरीची खातरजमा केली आणि १८ मार्च २०२६ रोजी कंपनीचे प्रतिनिधी श्री योगेश काजळे, श्री नितीन कदम आणि श्री जितेंद्र राक्षे यांना पदक व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले. पुण्यातील ही विक्रमी कामगिरी आता देशभरात चर्चेचा विषय ठरत असून,आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर बांधकाम क्षेत्रात क्रांती घडू शकते,याचे जिवंत उदाहरण ठरली

# पुणे महापालिकेत नव्याने समाविष्ट गावांमधील कर आकारणीबाबत सभासदांची समिती स्थापन करणार-महापौर मंजुषा नागपुरे

**पुणे:**पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील कर आकारणीबाबत नागरिकांच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर महापौर मंजुषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली दि.१६ मार्च २०२६ रोजी परिमंडळ क्र.२ कार्यालय, घोले रोड,शिवाजीनगर येथे विशेष बैठक आयोजित करण्यात आली.

बैठकीत कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत कर आकारणी संदर्भात सविस्तर सादरीकरण करण्यात आले. नागरिक व लोकप्रतिनिधींनी निवासी व बिगर निवासी मिळकतींवर जास्त कर आकारणी,शेजारील गावांचा ए.आर.व्ही.विचारात न घेणे तसेच ग्रामपंचायत पद्धतीने कर आकारणी करण्याची मागणी मांडली.तसेच आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध नसताना महानगरपालिका दराने कर आकारणी होत असल्याबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली.दंड,शास्ती व व्याज आकारणीबाबतही नागरिकांनी आक्षेप नोंदविले.प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले की, विद्यमान कर आकारणी धोरण हे मुख्य सभेच्या ठरावांनुसार लागू करण्यात आले आहे.यावेळी महापौर यांनी या विषयावर सभासदांची समिती स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला. संबंधितांनी आपल्या लेखी सूचना सादर करण्याचे आवाहन करण्यात आले असून प्रशासनाशी चर्चा करून योग्य तो मार्ग काढण्यात येणार आहे.या बैठकीस अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., उपआयुक्त रवी पवार, तसेच काका चव्हाण, सुभाष नाणेकर यांच्यासह अनेक सभासद आणि अधिकारी उपस्थित होते. महत्त्वाचा निर्णय नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी सभासदांची विशेष समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.या समितीमार्फत कर आकारणी प्रक्रियेचे परीक्षण करून पुढील उपाययोजना सुचवण्यात येणार आहेत.

